CNR No.MHRG090004822023 **फौजदारी चौकशी अर्ज क्र.११२/२०२३**

मेघा कोल्हटकर व २

वि.

रुपेश कोल्हटकर व १

## नि.क्र.०५ वरील आदेश
## (दिनांक १०/०२/२०२५ रोजी पारित)

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम २३ अन्वये अंतरीम आदेशासाठी दाखल केला असून तिचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे.

०२. अर्जदार क्र.०१ व सामनेवाला क्र.०१ यांचा दिनांक ३०.०४.२०१५ रोजी मौजे रोठ, ता. रोहा येथे विवाह झाला. अर्जदार हिस कानातील कुडी, सामनेवाल्यासाठी अंगठी, चैन असे दागिने दिले व कपाट, टि.व्ही. इतर संसार उपयोगी भेटी दिल्या.

०३. अर्जदार क्र.०१ चे कथन असे की, अर्जदार क्र.०१ ही सामनेवाला क्र.०१ सोबत मौजे कोकबन, ता. रोहा येथे नांदावयास गेली. लग्नानंतर एक वर्ष संसार झाला. त्यानंतर अर्जदाराचे धाकट्या दिराचे सन २०१६ मध्ये लग्न झाल्यावर सामनेवाला क्र.०१ चे वागणुकीत बदल झाला, तो कोणत्याही कारणावरुन अर्जदार हिचेशी भांडणे करु लागला.

०४. सामनेवाला क्र.०१ हा सामनेवाली क्र.०२ हिचे सांगण्यावरुन अर्जदारास मारझोड करु लागला त्यावेळेस अर्जदार गरोदर होती. अर्जदाराला मुलगा झाल्यानंतर मुलाचे

औषधपाण्याकरीता किंवा अर्जदाराचे स्वतःचे खर्चाकरीता सुद्धा सामनेवाला क्र.०१ हा अर्जदारास पैसे देत नव्हता. सामनेवाली क्र.०२ अर्जदारास उद्देशून ''रांड आमचे घरी पडली आहे तुझी जाउ पहा कसे पैसे कमवते, तुझ्या बापाकडून पैसे आण'' असे म्हणून सामनेवाला क्र.०१ व ०२ सतत अर्जदाराकडून पाच लाखाची मागणी करीत.

०५. जानेवारी, २०१८ मध्ये अर्जदाराने नाईलाजाने माहेरच्या माणसांना सर्व घटनांबाबत सांगितले व बोलावून घेतले. अर्जदाराचे आई–वडील, भाउ व अन्य इसम सामनेवाल्याचे घरी जमले व सामनेवाल्याचे गावातील प्रतिष्ठीत व्यक्तींना बोलावून घेवून बैठक घेतली, त्या बैठकीत अर्जदार व सामनेवाला नं.१ यांना वेगळे बि–हाड मांडून देण्याचे ठरले. सामनेवाला क्र.०१ ने चणेरा बाफजीनगर येथे भाड्याने खोली घेतली. तेथे अर्जदार व सामनेवाला क्र.०१ उभयतांनी संसार सुरु केला. तरीही सामनेवाल्याचे वागण्यात कोणताही बदल झाला नाही.

०६. फेब्रुवारी, २०१८ मध्ये सामनेवाला क्र.०१ व ०२ यांनी विनाकारण अर्जदाराशी भांडण करुन तिला बेदम कारहाण केली व अर्जदार क्र.०१ व ०२ यांना घराबाहेर काढले. अर्जदाराच्या आई–वडीलांनी पंच बोलावून मिटींग घेतली, सदरचे बैठकीत सामनेवाला क्र.०१ ने अर्जदारास नांदवायचे नाही असे सांगितले. त्यानंतर पुन्हा तडजोड झाल्यानंतर अर्जदार क्र.०१ व सामनेवाला क्र.०२ हे एकत्र राहू लागले. दरम्यानच्या काळात त्यांना कु. रुत्वी झाली.

०७. सामनेवाला क्र.०१ च्या वागण्यात कोणताही बदल होत नसल्याने अर्जदार क्र.०१ ही तिच्या मुलांसह अर्जदाराच्या आई–वडीलांकडे राहत असून अर्जदारास कायमस्वरुपी अशी निवासाची कोणतीही सोय नाही. सामनेवाला क्र.०१ ची रिक्षा असून त्यास दर महा रक्कम रु.२५,०००/– उत्पन्न आहे. तसेच अर्जदाराचा भाऊ कॉन्ट्रॅक्ट स्वरुपात नोकरी करतो.

०८. अर्जदार क्र.०१ ला कोणतेही उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सदरचा मुळ अर्ज निकाली लागेपर्यंत काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने दरम्यानच्या काळात तात्पुरत्या स्वरुपात सामनेवाला क्र.०१ याने दर महा रु.१०,०००/– उदरनिर्वाहाकरीता द्यावे तसेच नुकसान भरपाई रक्कम रु.८,५०,०००/– द्यावे ही विनंती केली आहे.

०९. सामनेवाला क्र.०१ स्वत तसेच वकीलांमार्फत न्यायालयात हजर राहुन त्यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.१९ नुसार दाखल केले. त्यांनी त्यांचा व अर्जदार क्र.०१ यांचा विवाह मान्य केला असून त्यांचे म्हणणे असे की, अर्जदारास नेहमी माहेरचा ओढा असल्याकारणाने अर्जदार जास्तीत जास्त दिवस माहेरी जायची. सामनेवाला क्र.०१ चा मिनीडोअर रिक्षा चालवण्याचा व्यवसाय असून अर्जदार सामनेवाला क्र.०१ ला सदर व्यवसाय करणेचा नाही व धाटाव एम.आय.डी.डी. मधील कंपनीत नोकरी करावी तसेच रोहा येथे भाड्याने रुम घेवून रहायचे अशी मागणी केली. सामनेवाला क्र.०२ ने अर्जदार क्र.०१ ला नेहमी मुलीप्रमाणे वागवले. अर्जदार हिचा लहरी व हट्टी स्वभावाकडे दुर्लक्ष करुन आजही अर्जदारास

नांदवण्यास तयार आहे. अर्जदाराने कोणतेही रास्त कारण नसतांना तिच्याकडे असलेले सर्व दागिने घेऊन सामनेवाल्या बरोबर वाद घालून त्यास शिवीगाळ करुन काही न सांगता सामनेवाल्याचे घर सोडले, त्यामुळे सामनेवाला याचे शारिरक व मानसिक हालास अर्जदार हे कारणीभूत झाले आहेत. त्यामुळे तिचा अर्ज फेटाळण्यात यावा.

१०. अर्जदार क्र.०१ यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. खालील मुद्दे विचारार्थ निघत असून मी त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| **क्र.** | **मूद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार ही महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ०२. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**:: कारणमिमांसा ::**

**<u>मुद्दे क्र.०१ करीता :–</u>**

११. अर्जदार क्र.०१ व सामनेवाला क्र.०१ यांचा विवाह दि.३०.०४.२०१५ रोजी झालेला असून सदर विवाह संबंधातून त्यांना एक मूलगा नामे निल वय वर्ष ०८ आणि एक

मुलगी रुत्वी वय वर्ष ०३ आहे. सामनेवाला यांनी अर्जदार व त्यांचा विवाह मान्य केलेला आहे. परंतू अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदार पुढे असे कथन करते की, ती तिच्या उदरनिर्वाहासाठी तिच्या वडीलांवर अवलंबून आहे.

१२. सामनेवाला क्र.०१ यांची रिक्षा असून त्यास दरमहा २५,०००/– उत्पन्न आहे. अर्जदाराचे कथन असे आहे की, सामनेवाला क्र.०१ याने दरमहा रक्कम रुपये २०,०००/– पोटगी द्यावी.

१३. अर्जदाराच्या कथनांवरुन असे दिसून येते की अर्जदार ही तिच्या मुलांसह तिच्या वडीलांकडे राहत आहे. सामनेवाला यांनी अर्जदारास शारीरीक व मानसिक छळ केला आहे. याउलट सामनेवाला यांच्या अर्जातील कथनांवरुन अर्जदार तिच्या मर्जीने घर सोडून गेलेली आहे. परंतु अर्जदार हिस सामनेवाला यांनी माहेरी निघून जाण्यास भाग पाडले अगर ती स्वतःहून माहेरी आली या सर्व बाबी दोन्ही बाजूंचा पुरावा आल्यानंतर सिध्द होणार आहेत.

१४. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, सन २०१६ मध्ये सामनेवाला क्र.०१ याच्या वागणूकीत बदल झाला तो अर्जदाराला मारझोड करुन मानसिक त्रास देऊ लागला. सामनेवाला क्र.०१ व ०२ हे अर्जदाराकडे रक्कम रुपये पाच लाखाची मागणी करत होते, आणि तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करुन मारहाण करुन उपाशी ठेवत होते. अर्जदाराच्या कथनावरुन एकंदरीत असे दिसून येते की, अर्जदार व सामनवाला यांच्यामध्ये बराच वेळेला

समेट घडून आणण्याचा प्रयत्न केला परंतु काही उपयोग झाला नाही. अर्जदाराने याआधी देखील न्यायालयात अर्ज दाखल केलेला होता, आणि सामनेवाला हा चांगला वागेल या समजूतीखाली ती पुन्हा सामनेवाला सोबत राहायला देखील गेली होती, परंतु सामनेवालाचे वागणूकीमध्ये काहिही फरक पडला नाही. अर्जदार पुढे असे कथन करते की, ती व तिची मुलगी व मुलगा त्यांच्या उदरनिर्वाहासाठी तिच्या वडीलांवर अवलंबून आहे. सामनेवाला क्र.०१ रिक्षा चालवतो व त्यांस अंदाजे दरमहा रक्कम रु.२५,०००/- उत्पन्न मिळत आहे असे कथन केले आहे.

१५. अर्जदाराने नि.क्र.२४ कडे स्थावर व जंगम मालमत्तेबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सामनेवाला क्र.०१ यांनी नि.क्र.२६ कडे त्यांचे स्थावर व जंगम मालमत्तेबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. अर्जदाराने सामनेवाला हा महिन्याला किती कमावतो हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नाही.

१६. अर्जदार ही तिच्या मुलांसह माहेरी वडीलांकडे राहत असल्याचे अर्जातील कथनांवरुन लक्षात येते. अर्जदार ही सामनेवाला क्र.०१ याची कायदेशिर पत्नी आहे त्यामुळे सामनेवाला क्र.०१ अर्जदाराची व त्यांच्या मुलांची जबाबदारी कोणत्याही परिस्थीतीमध्ये नाकारू शकत नाही. पत्नी व मुलांची जबाबदारी घेणे हे सामने वाला याचे कर्तव्य आहे. सामनेवाला हा महिना रक्कम रु.२५,०००/- कमवतो हे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. परंतू अर्जदार क्र.०१ ते ०३ यांची संपूर्ण जबाबदारी ही सामनेवाला क्र.०१ ची आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.०१ हा अर्जदार हिस अंतरिम पोटगी देणे

लागतो. त्यामुळे मी मुद्या क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवून मुद्या क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (नि. क्र. ५) अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.०१ याने अर्जदार क्र.०१ हिस दरमहा रक्कम रु. २,५००/- (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे मात्र) एवढी अंतरीम पोटगी अर्ज दाखल तारखे पासून ते मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत दयावेत.

३. सामनेवाला क्र.०१ ने अर्जदार क्र. ०२ निल रुपेश कोलटकर यांस दरमहा प्रत्येकी रक्कम रु.२५००/- (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे मात्र) एवढी रक्कम आर्थिक अंतरिम सहाय्य अर्ज दाखल केलेपासून मूळ अर्ज निकाली लागेपर्यंत दयावे.

४. सामनेवाला क्र.०१ ने अर्जदार क्र.०३ रुत्वी हिस दरमहा प्रत्येकी रक्कम रु.२,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार रुपये मात्र) एवढी रक्कम आर्थिक अंतरिम सहाय्य अर्ज दाखल केलेपासून मूळ अर्ज निकाली लागेपर्यंत दयावे.

५. या आदेशाची प्रत अर्जदार क्र.०१ व सामनेवाला क्र.०१ यांना मोफत देण्यात यावी.

सही/-

स्थळ : रोहा,
(एम. सी. हासगे)

दि.१०.०२.२०२५
न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.